2 7 NOV 2025

तरुण भारत




कोल्हापूर : संविधान प्रास्ताविकेचे वाचन करताना मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठात संविधान दिन साजरा

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात बुधवारी संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान दिनानिमित्त संविधान प्रास्ताविकेस अभिवादन करण्यात येऊन प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेले शूर पोलीस अधिकारी आणि जवान यांच्या प्रतिमांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. प्रमोद पांडव, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

27 NOV 2025

ग्लोबल टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान दिनानिमित्त संविधान प्रास्ताविकेस अभिवादन करण्यात येऊन प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेले शूर पोलीस अधिकारी आणि जवान यांच्या प्रतिमांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. प्रमोद पांडव, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

27 NOV 2025

दै० जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात संविधान, शहीद दिन साजरा

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान दिनानिमित्त संविधान प्रास्ताविकेस अभिवादन करून, प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेले शूर पोलीस अधिकारी आणि जवान यांच्या प्रतिमांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. प्रमोद पांडव, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुस्लिम बोर्डिंगतर्फे संविधान रॅली

जनप्रवास : कोल्हापूर

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यामुळे देशाची प्रचंड हानी झाली. २६/११ ला मुंबईवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करत कोल्हापुरातील मुस्लिम बोर्डिंग, मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटी, नेहरू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या वतीने संविधान रॅली काढण्यात आली. तसेच दसरा चौकात पाकिस्तानच्या निषेधाच्या घोषणा देत निदर्शने करण्यात आली.

कोल्हापुरातील मुस्लिम बोर्डिंग, मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटी, नेहरू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्यावतीने आज संविधान रॅली काढण्यात आली. संस्थेपासून देशभूषण हायस्कूल, आकाशवाणी, मोहल्ला, मराठा बँक, भाऊसिंगजी रोड, सर्किट बेंच, सीपीआर चौकातून ही रॅली दसरा चौकात आली. नंतर दसरा चौकात पाकिस्तानच्या निषेधाच्या घोषणा देत निदर्शने करण्यात आली. संविधानाचा विजय असो..., मुर्दाबाद मुर्दाबाद पाकिस्तान मुर्दाबाद... अशा घोषणांनी विद्यार्थी आणि शिक्षकांनी दसरा चौक आणि परिसर दणाणून सोडला. अशोक कामटे, विजय साळसकर, हेमंत करकरे यांच्यासह या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी बोर्डिंगचे प्रशासक कादर मलबारी, मुख्याध्यापक मसूद अस्लम काझी, रमजान मुल्ला, जाहिद शिरढोणे, ए. वाय. मुजावर, मुश्रिफ मुटाबकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

2 7 NOV 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहरासह जिल्ह्यात संविधान दिन उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टी**

भारतीय जनता पार्टी कोल्हापूरच्या वतीने ऐतिहासिक बिंदू चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्यांना खासदार धनंजय महाडिक, जिल्हाध्यक्ष विजय जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधान प्रतिमेचे पूजनदेखील करण्यात आले. याप्रसंगी खासदार धनंजय महाडिक, जिल्हाध्यक्ष विजय जाधव, राहुल चिकोडे, विराज चिखलीकर, अमर साठे, धनश्री तोडकर, माधुरी नकाते, रूपाराणी निकम, भरत काळे, हेमंत आराध्ये, विजय अग्रवाल, गणेश देसाई, अतुल चव्हाण, दीपक काटकर, रोहित पोवार, मंगला निपाणीकर, राजसिंह शेळके, विश्वजित पवार, अनिल कामत, महेश यादव, आजम जमादार, विशाल शिराळकर, कोमल देसाई, रविकिरण गवळी, सुनील पाटील, रिना पालनकर, सीमा पालकर, सरिता हारुगले, अलका जावीर, छाया साळुंखे, अश्विनी गोपुडगे, तेजस्विनी पार्टे, स्वाती कदम, किरण नकाते, भूषण कानकेकर, संग्राम निंबाळकर, अॅड. मनोज कदम, मनोज औंधकर, अभिजित शिंदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

**शिवाजी विद्यापीठ**

विद्यापीठात संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन करण्यात येऊन प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर मुंबईवर दि. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेले शूर पोलीस अधिकारी आणि जवान यांच्या प्रतिमांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. प्रमोद पांडव, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



कोल्हापूर : शहरात संविधान दिनानिमित्त प्रतिज्ञा घेताना जिल्हाधिकारी अमोल येडगे. सोबत मान्यवर व विद्यार्थी. (छा... पांडुरंग पाटील)

**कॉमर्स कॉलेज**


देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत संविधान सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## संविधानाने दिलेल्या मूल्यांचा आदर करा

### डॉ. अच्युत माने यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वतःवर प्रेम करत करत देशावरही मनापासून प्रेम करा. या देशात कोणी शोषित कोणी गरीब राहू नये, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधान मूल्यांचा सर्वांनी आदर करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अच्युत माने यांनी केले.



महावीर महाविद्यालयात आयोजित संविधान दिन कार्यक्रमात बोलताना डॉ. अच्युत माने.

महावीर महाविद्यालयात आयोजित केलेल्या संविधान दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी होते. डॉ. गोमटेश्वर पाटील व डॉ. महादेव शिंदे यांची प्रमुख ... होती.

... स्वागत व प्रास्तविक ... विभागप्रमुख डॉ. ...कवाड, सूत्रसंचालन ... मसाळ यांनी केले. ... गायकवाड यांनी ...

... विभागप्रमुख डॉ. श्रीपाद ... व्याख्यान झाले. ...ी महाविद्यालयाच्या

## भारतीय संविधान हा देशाचा सर्वात मोठा ग्रंथ : बुगडे

**कागल : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले जगातील सर्वात मोठे लिखित संविधान म्हणजे देशाचा सर्वात मोठा ग्रंथ आहे, असे उद्गार मुख्याध्यापक अशोक बुगडे यांनी काढले.

दूधगंगा विद्यालय धरणग्रस्त कागल येथे भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून विविध जनजागृतीपर व शैक्षणिक कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधानाच्या प्रतीचे पूजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षणातील वाटा माहिती व्हाव्यात, या उद्देशाने व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत कॉमर्स क्षेत्रातील भविष्य या विषयी चार्टर्ड अकौंटंट राघवेंद्र बकरे यांनी युवकांना सध्याच्या काळातील कॉमर्स क्षेत्रातील व्यावसायिक संधी आणि स्वयंरोजगाराबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर सुशांट गाट, अलोक शहा ...ातील संधींविषयी ... केले. विद्यार्थ्यांसाठी ... चित्रकला स्पर्धांचे ... करण्यात आले.

...ाचे मुख्य आकर्षण ... मानवी साखळी आणि ... फेरी. विद्यार्थ्यांनी ...च्या मैदानावर भव्य ... साखळी तयार केली.

...च्या प्रमुख मार्गावरून ... फेरी काढण्यात आली. ... पुरंदर कांबळे यांनी ... नाथा चव्हाण यांनी

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार

### डॉ. रायदुरगम नारायण यांचे प्रतिपादन

नणुंद्रे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत. भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित राष्ट्रीय संविधान आहे. संविधान भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक घोषित करते. तेथील नागरिकांना न्याय, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाला चालना देण्यासाठी प्रयत्नांची हमी देते, असे प्रतिपादन प्रो. डॉ. रायदुरगम नारायण यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड सायन्स कॉलेज व श्रीपतराव चौगुले विधी महाविद्यालय, माळवाडी-कोतोली यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त व श्रीपतराव चौगुले (दादा) यांच्या १४ व्या स्मृतिदिनानिमित्त दि. २६ नोव्हेंबर संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान पारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, प्राचार्य डॉ. संपदा पिसे, ज्युनिअर विभागप्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार, पत्रकार विक्रम पाटील होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधानाचे पूजन प्रो. डॉ. नारायण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. प्रास्ताविक व स्वागत लेफ्टनंट डॉ. मनीषा सावंत, पाहुण्यांची ओळख डॉ. संपदा पिसे यांनी करून दिली. आभार डॉ. यू. एन. लाड यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. डी. एच. नाईक यांनी केले.

प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी होत्या. डॉ. आर. एस. नाईक, ग्रंथपाल तानाजी कांबळे, डॉ. अशोक बन्ने, डॉ. संतोष गवई आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**महापालिकेत संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन**

कोल्हापूर : संविधान दिनानिमित्त महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी भारताच्या संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. आपल्या भारत देशात दरवर्षी दि. २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो. या संविधान दिनानिमित्त महानगरपालिकेच्या कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे चौकामध्ये बुधवारी अतिरिक्त आयुक्त शिल्पा दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली या संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमास उपायुक्त परितोष कंकाळ, मुख्य लेखापरीक्षक कलावती मिसाळ, वित्त अधिकारी राजश्री पाटील, कामगार अधिकारी राम काटकर, कर निर्धारक व संग्राहक सुधाकर चल्लावाड, रवका अधिकारी प्रशांत पंडत, मुख्य अग्निशम अधिकारी मनीष रणभिसे, जनसंपर्क अधिकारी मोहन सूर्यवंशी यांच्यासह महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**दलित महासंघाच्या वतीने कोडोलीत संविधान दिन**

वारणानगर-कोडोली : कोडोली, ता. पन्हाळा येथील सर्वोदय चौकात भारतीय दलित महासंघाच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी कोडोलीचे सहायक निरीक्षक कैलास कोडग व यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या विश्वस्त विनीता पाटील होत्या. भारतीय दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष श्रीकांत कांबळे यांच्या मार्गदर्शनानुसार अभिजित बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून व भारतीय संविधानाला अभिवादन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. उपस्थितांचा सत्कार धनश्री बनसोडे व संजय निकम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विनीता पाटील, कैलास कोडग, अनिरुद्ध कांबळे, दयानंद कांबळे, दीपक सकटे, विक्रम समुद्रे, प्रकाश महापुरे, शाहरुख पेटकर, मनोज गायकवाड, निखिल कोळी, अमोल महापुरे आदी उपस्थित होते.

2 7 NOV 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधान मसुद्यावर ज्येष्ठ नेते रत्नाप्पा कुंभार यांची सही

## संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर मिळाला गतस्मृतींना उजाळा



कोल्हापूर प्रतिनिधी

भारतीय संविधान म्हणजे आपल्या देशाची घटना. या संविधानावर संविधान सभेच्या २८४ सदस्यांच्या सह्या आहेत. आणि त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते आणि स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी रत्नाप्पा कुंभार यांचीही सही आहे.

तरुण भारत अँकर

भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खूप मोलाचा असा वाटा राहिला आहे. संविधान दिनाच्या निमित्ताने बुधवारी डॉ. आंबेडकर यांच्या योगदानाचा गौरव झाला. देशभरात विविध ठिकाणी साजऱ्या झालेल्या संविधान दिन कार्यक्रमात गौरव झाला. आपल्या कोल्हापूर जिल्ह्याचे नेते रत्नाप्पा कुंभार यांची संविधान सभेचे सदस्य म्हणून सही असल्याने त्यांच्याही सहभागाच्या स्मृतींना उजाळा मिळाला. नव्या पिढीला नक्कीच याची फारशी माहिती नाही. पण कोल्हापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी रत्नाप्पा कुंभार यांची स्मृती या निमित्ताने अनेकांनी जागी केली.

**११ महिने संविधानावर चर्चा**


भारतीय संविधानावर संविधान सभेच्या २८४ सदस्यांनी स्वाक्षरी केली. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते रत्नाप्पा कुंभार यांची सही आहे. डॉ. नंदकुमार कुंभार यांनी संविधानाच्या प्रतीवरील सहीचे पान शिवाजी विद्यापीठाच्या लायब्ररीतून उपलब्ध केले. या संविधान सभेत सभेने तब्बल ११ महिने या संविधानावर चर्चा केली. आज कोल्हापूर जिल्ह्यात या स्मृतींना उजाळा मिळाला.

**१९५२ मध्ये खासदार**

रत्नापा कुंभार १९५२ च्या पहिल्या निवडणुकीत खासदार झाले. त्यानंतर पाचवेळा आमदार आणि राज्यमंत्री झाले. १९५५ साली त्यांनी महाराष्ट्रातील दुसरा सहकारी साखर कारखाना सुरू केला. त्यानंतर त्यांनी सहकारी सूतगिरणी, सहकारी बँक आणि शाळा, कॉलेजस अनेक संस्था सुरू केल्या.

### २६ नोव्हेंबरला संविधानाचा स्वीकार

- घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी १३ समित्या होत्या. जानेवारी १९४८ मध्ये संविधानाचे पहिले प्रारूप चर्चेसाठी मांडले गेले. त्यावर ४ नोव्हेंबर १९४८ रोजी चर्चा सुरू झाली. त्याच कालावधीत काही दुरुस्त्या सुचवण्यात आल्या.
- २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाचा स्वीकार करण्यात आला. आणि २४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेच्या २८४ सदस्यांच्या यावर सह्या झाल्या.
- २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले. त्यामुळे २६ नोव्हेंबर म्हणजे ज्या दिवशी संविधानाचा स्वीकार करण्यात आला. तो दिवस भारतीय संविधान दिन म्हणून मानला गेला.




कोल्हापूर : भारतीय संविधानाच्या अंतिम मसुद्यावर कोल्हापुरातील ज्येष्ठ नेते स्वातंत्र्यसैनिक रत्नाप्पा कुंभार यांची सही आहे. डॉ. नंदकुमार कुंभार यांनी संविधानाच्या प्रतीवरील सहीचे पान शिवाजी विद्यापीठाच्या लायब्ररीतून उपलब्ध केले.

2 7 NOV 2025
तरुण भारत

# 'एआय इन द लायब्ररी'तून ग्रंथालयाचे आधुनिकीकरण

- शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय चर्चासत्र संपन्न

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागामार्फत प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम–उषा) या योजनेअंतर्गत 'एआय इन द लायब्ररीः ट्रान्सफॉर्मिंग द फ्युचर ऑफ इन्फॉर्मेशन एक्सेस' या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्र संपन्न झाले. यातून ग्रंथालयामध्ये एआयच्या माध्यमातून आधुनिकीकरण होणार असल्याचा सुर उमटला.

न्यू कॉलेजचे ग्रंथपाल डॉ. आर. पी. अडाव यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन, झाले. शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्र. संचालक डॉ. डी. बी. सुतार, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांची प्रमुख उपस्थिती होती. अधिविभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

सहयोगी प्राध्यापक डॉ. वाय. जी. जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सहाय्यक प्राध्यापक व्ही. पी. गुरव यांनी आभार मानले. चर्चासत्रामध्ये डॉ. आर. पी. अडाव, डॉ. विलास जाधव, डॉ. सचिन माळी, विश्वास हसे, चेतन टाकसाळे यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा ग्रंथालयातील वापर' या विषयावर

27 NOV 2025

सकाळ

# ग्रंथालयांच्या भवितव्यावर विद्यापीठात चर्चा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागातर्फे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) या योजनेअंतर्गत 'एआय इन द लायब्ररी: ट्रान्स्फॉर्मिंग द फ्युचर ऑफ इन्फॉर्मेशन एक्सेस' या विषयावर सोमवारी, मंगळवारी चर्चासत्र झाले. उद्घाटन न्यू कॉलेजचे ग्रंथपाल डॉ. आर. पी. आढाव यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार प्रमुख उपस्थित होते. डॉ. आढाव, विलास जाधव, सचिन माळी, विश्वास हसे, चेतन टाकसाळे यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा ग्रंथालयातील वापर' या विषयावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे उपग्रंथपाल होते. अधिविभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख सहयोगी प्राध्यापक डॉ. वाय. जी. जाधव यांनी करून केली. सहायक प्राध्यापक व्ही. पी. गुरव यांनी आभार मानले.

2 7 NOV 2025

पुण्यनगरी

# ग्रंथालयांच्या भवितव्याविषयी विद्यापीठात चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागामार्फत प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) या योजनेंतर्गत 'एआय इन द लायब्ररी : ट्रान्सफॉर्मिंग द फ्यूचर ऑफ इन्फॉर्मेशन एक्सेस' या विषयावर दि. २४ व २५ नोव्हेंबर रोजी दोन दिवसीय चर्चासत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन प्रमुख अतिथी डॉ. आर. पी. अडाव, ग्रंथपाल न्यू कॉलेज, कोल्हापूर यांच्या हस्ते व डॉ. डी. बी. सुतार, प्र. संचालक, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अधिविभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख सहयोगी प्राध्यापक डॉ. वाय. जी. जाधव यांनी करून दिली. सहायक प्राध्यापक व्ही. पी. गुरव यांनी आभार मानले. दोन दिवसीय चर्चासत्रामध्ये साधन व्यक्ती म्हणून उपस्थित असणारे डॉ. आर. पी. अडाव, डॉ. विलास जाधव, डॉ. सचिन माळी, विश्वास हसे आणि चेतन टाकसाळे यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा ग्रंथालयातील वापर' या विषयावर उपस्थितांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. समारोपसत्राचे अध्यक्षस्थान डॉ. पी. बी. बिलावर, उपग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी भूषवले.

2 7 NOV 2025

पुढारी



कोल्हापूर : माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना शिवाजी विद्यापीठात आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नितीन माळी, डॉ. गजानन साळुंखे, डॉ. सुधीर देसाई आदी उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण यांना विद्यापीठात आदरांजली

**कोल्हापूर :** राज्याचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमध्ये यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे आदरांजली वाहण्यात आली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. गजानन साळुंखे, डॉ. सुधीर देसाई, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, चेतन गळगे आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

2 7 NOV 2025

तरुण भारत

# ३१ हजार विद्यार्थ्यांनी दिली विद्यापीठाची परीक्षा




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर – २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षअंतर्गत बुधवारी ६९ विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने पार पडल्या. विविध १८५ परीक्षा केंद्रावर झाल्या असुन ३१ हजार ३१२ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने भरारी पथके स्थापन केली आहेत. बुधवारी या पथकाकडून १९ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद करण्यात आलेली आहे. यामध्ये कोल्हापूर विभागातून १४, सांगली विभागातून ४ व सातारा विभागातून १ गैरप्रकार उघडकीस आले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 7 NOV 2025

तरुण भारत

# आंतर विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत नाईट कॉलेज उपविजेते

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभागातर्फे आयोजित आंतर विभागीय बास्केटबॉल पुरुष स्पर्धा शहाजी लॉ कॉलेजच्या क्रीडांगणावर उत्साहात व दिमाखात पार पडली.

या स्पर्धेत कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्स महाविद्यालयातील खेळाडूंनी द्वितीय क्रमांकाचे मानाचे स्थान पटकावले. विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उत्तम पाटील, उपप्राचार्य, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सुरेश फराकटे तसेच बास्केटबॉल संघातील खेळाडू उपस्थित होते. या यशामागे कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे अध्यक्षा सौ. रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, संचालक ॲड. वैभव पेडणेकर, ॲड. अमित बाडकर तसेच महाविद्यालयातील समर्पित शिक्षकांचे मार्गदर्शन लाभल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

नाईट कॉलेजच्या संघाने उत्कृष्ट संघभावना, जिद्द आणि शिस्तीच्या बळावर मिळवलेले हे यश महाविद्यालयासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.



27 NOV 2025

सकाळ



ऋषिकेश साखरे



अनिशा जाधव

# ऋषिकेश, अनिशाचे क्रीडा स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत महावीर महाविद्यालयात बी.ए. भाग एकमधील ऋषिकेश साखरे याने गोळाफेक प्रकारात १५.४० मीटर गोळा फेकून प्रथम क्रमांक मिळवला. नांदेड येथे होणाऱ्या अश्वमेध क्रीडा स्पर्धेसाठी त्याची निवड झाली. बी.ए. भाग एकमधील अनिशा जाधव हिने स्टीपल चेस प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला. त्यांना संस्थेचे अध्यक्ष ॲड. के. ए. कापसे, उपाध्यक्ष ॲड. अभिजित कापसे, सचिव एम. बी. गरगटे, प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी, प्रा. डॉ. रोहित पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

27 NOV 2025
सकाळ

# शीतल कुलकर्णी यांना पीएच.डी.



**शीतल कुलकर्णी**

**कोल्हापूर :** शीतल विजय कुलकर्णी यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच. डी. मिळाली. त्या विद्यापीठाच्या भाषा विभागात संशोधक आहेत. त्यांनी 'द कंटेम्परी वेस्टर्न व्ह्यू ऑफ रशिया : अ स्टडी ऑफ सिलेक्टेड ट्रॅव्हलॉग्स ऑफ ट्वेंटी फर्स्ट सेंचुरी' या विषयावर त्यांनी शोध प्रबंध सादर केला. त्यांना विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांचे मार्गदर्शन लाभले.